
।। श्री गजानन प्रसन्न ।।

।। श्री केशवराज प्रसन्न ।।




आपली आहे प्रगतीची

# वाटचाल


* वर्ष २२ वे, अंक ४
* दि. १५ डिसेंबर २०२२
* किंमत रु. २०/-



आपले एक कुलबंधू श्री. सदाशिवराव देवधर यांची भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांनी आवर्जून बोलावून भेट घेतली. त्या वेळचे छायाचित्र. सविस्तर वृत्त पान क्र. १० वर आहे.



डोंबिवलीचे प्रा. गजानन देवधर यांनी विख्याच चित्रकार साल्वादोर दाली याच्या स्पेनमधील फिगुरेस या गावाला भेट दिली. दालीच्या कलाकृती ठेवलेल्या संग्रहालयाची ही छायाचित्रे. सविस्तर वृत्त पान क्र. १६ वर आहे.

# अध्यक्षांचे मनोगत



नमस्कार.

आज संपूर्ण जगात एका गोष्टीबद्दल सर्वांचे एकमत आहे, ते म्हणजे जगातील प्रत्येक व्यक्ती ही साक्षर असेल तरच जग प्रगतीपथावर वाटचाल करीत राहील. आपला देश स्वतंत्र झाला त्या वेळी आपल्याकडील साक्षरतेचे प्रमाण सुमारे २० टक्के एवढे होते, ते प्रमाण २०२२ साली ७५ टक्के एवढे झाले आहे.

एका बाजूला साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. शासकीय योजना बनवणारेही उच्चशिक्षित आहेत, पण भ्रष्टाचार कमी होत नाही. सध्याचे शिक्षण हे परीक्षार्थी निर्माण करणारे कारखाने होत चालले आहे. आवश्यक ते नैतिक शिक्षण कमी पडताना दिसते गेल्या ७५ वर्षात भौतिकतेचा निर्देशांक वाढून नैतिकतेचा निर्देशांक दिवसेंदिवस घसरत आहे.

हे वेळीच सांभाळण्याची, त्यासाठी आवश्यक ते संस्कार संवर्धन करण्याची गरज आहे. ही प्रत्येक व्यक्तीची समाजाची जबाबदारी आहे. असो...

२०२३ चे वार्षिक स्नेहसंमेलन या वर्षी कोल्हापूर येथे मे महिन्यात आयोजित करण्याचा मानस आहे. या वर्षीच्या स्मरणिकेसाठी ‘पर्यटन’ ही संकल्पना ठरविली आहे.

*केल्याने देशाटन, पंडितमैत्री सभेत संचार*
*शास्त्रग्रंथ विलोकेन मनुजा चातुर्य येतसे फार*

आपले अनेक कुलबांधव देशविदेशात पर्यटनासाठी जात असतात. त्या वेळी आलेले अनुभव, घेतलेला आनंद, मिळविलेले चातुर्य, आपला लेख, प्रवासवर्णन, कविता, कथा यांद्वारे आमच्याकडे लिहून पाठवावेत, अर्थात फोटोंसह. त्यामुळे आपली या वर्षीची स्मरणिका नेहमींप्रमाणेच प्रेक्षणीय, वाचनीय आणि संग्राह्य होईल. सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे आपल्या कुल बंधुभगिनींना, विशेषतः तरुणाईला आपले कलागुण सादर करण्याची संधी मिळेल आणि आपल्याला आनंद घेता येईल.

गतवर्षीप्रमाणेच या वर्षीही हे स्नेहसंमेलन सशुल्क असेल. प्रत्येकी रुपये साडेसातशे फक्त एवढे शुल्क असणार आहे.

या संमेलनात नेहमीप्रमाणे जीवन गौरव पुरस्कार, समाजसेवी पुरस्कार, शैक्षणिक क्षेत्रासाठी दिला जाणारा पुरस्कार असणार आहेत.

दरवर्षीप्रमाणे वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्यांचे, तसेच विवाहास पन्नास वर्षे पूर्ण झालेल्या दांपत्याचे यथोचित सत्कार, गौरव, सन्मान आपण करणार आहोत.

संमेलनाची रूपरेषा स्थळ, वेळ, निवास व्यवस्था इत्यादी तपशील वाटचालच्या मार्च २०२३च्या अंकात प्रसिद्ध केला जाईल.

आम्हाला खात्री आहे की आपण बहुसंख्येने उपस्थित राहून वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभागी असाल.

दिनांक ५ नोव्हेंबर २०२२ रोजी डोंबिवली येथे झालेला आनंद मेळावा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. उपस्थिती चांगली होती. अशा आनंद मेळाव्यातून परस्पर परिचय वाढतो, भेटीगाठी होतात आणि देवधर मंडळाची वाटचाल खऱ्या

.....पान क्र. ७ वर

# देवधर मंडळ कार्यकारिणी

## दि. १ /४/२०१९ ते दि. ३१/३/२०२४

✻ **अध्यक्ष**

**सी.ए. सुरेश विश्वनाथ देवधर** (कु. वृ. पान २१/१६२)
१०२, आय विंग, प्रणय नगर, राममंदिर रोड (विस्तारित), बाभई, बोरिवली (प.), मुंबई ४०००९१
दूरध्वनी : ०२२-२८९८१८५६
मोबाईल : ९२२३३६६६४०, ९२२३५०६९८८

✻ **उपाध्यक्ष**

**ॲड. पुरुषोत्तम गोपाळ देवधर** (कु. वृ. पान ३६०/१६९)
ब्लॉक नं. २, भागिरथी टॉवर्स, सर्व्हे नं. ६, हि. नं. ११, कोकण एक्सप्रेस हॉटेल लेन, कोथरूड, पुणे ४११०३८. ❖ मोबाईल : ९८६०३०६३४४

✻ **कार्यवाह**

**श्रीमती सरिता मुकुंद देवधर** (कु. वृ. पान नं. ३५९/१२९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६, गिरगांव, मुंबई ४००००४.
दूरध्वनी : ०२२-२३८९३९३०
मोबाईल : ९८२०६५९४४७

✻ **सहकार्यवाह**

**सौ. पूर्वा प्रमोद देवधर** (स्वीकृत)
(कु. वृ. पान ८८२/१३२२)
११/१२ सी, दुसरा मजला, झावबा वाडी, ठाकूरद्वार, मुंबई ४००००२. मोबाईल : ९८६९९३९०७२

✻ **कोषाध्यक्ष**

**सी.ए. अकल्पिता चिंतामणी देवधर**
(कु. वृ. पान८९८/१७७८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गावदेवी चौक, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ९८२०३५६४१३

✻ **वाटचाल (मुद्रक, प्रकाशक)**

**श्री. आशिष राम देवधर** (कु. वृ. पान ३१/२०३६)
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ७०४५३५३६०२

✻ **सभासद**

**श्री. नारायण (दिलिप) गोविंद देवधर**
(कु.वृ. पान ४१८/१२३)
बी/१०३, आर.एन. ए. हाईट्स, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, अंधेरी (पू.), मुंबई ४०००९३.
दूरध्वनी : ०२२-२८२५२१४५
मोबाईल : ९८१९९७२५११

✻ **सभासद**

✻ **श्री. वासुदेव नारायण देवधर** (कु.वृ.पान ४९७/१४५) (स्वीकृत)
सी/३, १०२, सॅटेलाईट क्लासिक, रेल्वे स्टेशनजवळ, गुंफा रोड, जोगेश्वरी (पू.), मुंबई ४०००६०
दूरध्वनी : ०२२-२८२६१०२८, मो.: ९८२०१३४०८४

✻ **श्री. संजय सुधाकर देवधर** (कु. वृ. पान ४९१/१७७९)
ए/४२, अनुभव कॉम्प्लेक्स, स्नेह पॅराडाईज, एम.आय.टी कॉलज रोड, कोथरूड, पुणे ४११०३८.
मोबाईल : ९८२३०७३३११

✻ **श्री. समीर सुरेश देवधर** (कु. वृ. पान ५८८/२२४१) (स्वीकृत)
बी/२४, कैलासधाम सोसायटी, गोपाळनगर गल्ली क्र. १, टायटन शोरूम च्या जवळ, डोंबिवली (पू.) ४२१२०१
मोबाईल : ९८३३१४८४८५

✻ **श्री. विष्णू विनायक देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ४३९/१५२८)
बी-४, रूम नं. ३, सप्तर्षी सोसायटी, पांडुरंग वाडी, आनंदनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पू.) ४२१२०१
दूरध्वनी : ०२५१-२८०१८३०, मो. : ९८३३१५३९८९

✻ **कु. मीरा जगदीश देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ५३४/२४०६)
स्वप्नशिल्प, फ्लॅट नं. १, पहिला मजला,
नयनतारा नर्सिंग होम शेजारी, गुलमोहर कॉलनी,
सांगली ४१६४१६. मोबाईल : ७०८३८४१४५५

✻ **श्रीमती शुभांगी सुनिल देवधर** (कु. वृ. पान ३१०) (स्वीकृत)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर, नाशिक रोड, नाशिक ४२२१०१
दूरध्वनी : ०२५३-२४६४७८०
मोबाईल : ९८९०२४०५२२

✻ **मानद लेखा परीक्षक**

**सी.ए. किरण अनंत देवधर** (कु.वृ. पान १६२/१३७४)
१८ ई स्केअर, स्टेट बँकेच्या वर, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०००५७
मोबाईल : ९८२०३३५०९३


INVESTMENT
ADVISOR
MANJIRI SAMEER DEODHAR
MDRT FOR LAST 3 YEARS - 2019, 2020 & 2021
YOU WILL FIND UNDER ONE ROOF
✓ TATA AIA LIFE INSURANCE
✓ CARE HEALTH INSURANCE
✓ NEW INDIA ASSURANCE
✓ ALL TYPE OF INSURANCES
✓ MUTAL FUNDS
✓ DIFFERENT FLAVOURS OF INVESTMENTS
✓ ALL TYPES OF LOANS
✓ WILL WRITING
REACH ME
MOBILE NO.: 9833484857
EMAIL: manjiri06.deodhar@gmail.com
SOCIALLY CONTRIBUTING
SECRETARY -- CHITTAPAVAN SANGH, DOMBIVLI
JOINT SECRETARY -- BRAMHAN MAHASANGH, DOMBIVLI

# एक कळकळीचे आवाहन

सर्व कुल बंधुभगिनी आणि माहेरवाशीणींना सप्रेम नमस्कार.

आपणास माहीत आहे की, देवधर दीक्षित ढमढेरे या कौशिक गोत्री कुलबांधवांचे एक ज्ञाती मंडळ आहे. या मंडळाची स्थापना ४ फेब्रुवारी १९६८ साली झाली आहे. गेली ५४ वर्ष आपण या मंडळाच्या माध्यमातून अनेक उपयुक्त उपक्रम राबवित आहोत. आपल्यातील हुशार होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी आपण शैक्षणिक साहाय्य करीत असतो. (सदर विद्यार्थ्याने नोकरीस लागल्यावर स्वेच्छेने ही मदत परत करावी अशी अपेक्षा आहे.) अलीकडे आपण आणखी दोन नवीन उपक्रम सुरू केले आहेत. ते म्हणजे आपत्ती निवारण निधी आणि वैद्यकीय मदत निधी. या माध्यमातून आपण आपत्तीग्रस्त कुटुंबांना तसेच वैद्यकीय मदतीची गरज असलेल्या कुटुंबांना आर्थिक मदत करीत असतो. (वैद्यकीय मदत जेव्हा शक्य होईल तेव्हा स्वेच्छेने परत करावी अशी अपेक्षा आहे.)

आपल्या मंडळाचे दर तीन महिन्यांनी प्रसिद्ध होणारे वाटचाल हे त्रैमासिक आपण छपाई करून वितरित करतो. त्यामुळे आपण एकमेकांच्या संपर्कात राहू शकतो. देवधर मंडळाची वेबसाईटही आपण तयार केली आहे. त्यासाठीही खर्च होतो. हे सर्व उपक्रम सुरू राहण्यासाठी आपल्या मंडळाची आर्थिक स्थिती उत्तम असणे आपल्याकडे पुरेसा निधी उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रारंभी फक्त रुपये शंभर एवढीच आजीव सभासद वर्गणी होती. त्यानंतर जवळजवळ ४० वर्षांनी आजीव सभासद वर्गणी रुपये ३०० करण्यात आली. आता गेल्या तीन वर्षांपासून रुपये १,००० आजीव सभासद शुल्क घेण्यात येते. आत्तापर्यंत आपले दरवर्षी होणारे वार्षिक स्नेहसंमेलन आपण निशुल्क घेत होतो. या वर्षी २०२२ ते संमेलन सशुल्क केले. तरीही खानपानाशिवाय होणारा इतर खर्च मंडळाला करावा लागतो. संमेलन सशुल्क करूनही सभासदांनी त्याला उत्तम प्रतिसाद दिला, त्याबद्दल मनापासून आभार.

आपण हे सुद्धा जाणता, नव्हे आपण ते अनुभवतच आहोत की, दिवसेंदिवस महागाई वाढत आहे आणि बँकेचे व्याजदर कमी होत आहेत. आपल्या उत्पन्नाचा एकमेव स्रोत म्हणजे बँकेतून मिळणारे व्याज, ते मात्र कमी होत आहे. त्यामुळे एक नवीन उपक्रम सुरू केला आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये याबाबत चर्चा होऊन उपस्थित असलेल्या सर्व सभासदांनी त्यास सर्वानुमते मंजुरी दिली आहे.

तो उपक्रम असा -

मंडळाच्या प्रत्येक आजीव सभासदाने संवर्धन निधी म्हणून दरवर्षी मंडळाला रुपये ३०० द्यावेत. मंडळाकडे जमा करावेत. ते ज्या आर्थिक वर्षात आपण मंडळाचे आजीव सभासद होऊ, त्यानंतर सुरू होणाऱ्या वर्षापासून उदाहरणार्थ एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या आर्थिक वर्षात ते सभासद होतील त्यांनी त्यांनी ती वर्गणी अथवा निधी एप्रिल २३ पासून सुरू

होणाऱ्या प्रत्येक आर्थिक वर्षी देणे अपेक्षित आहे. हा संवर्धन निधी मंडळाच्या कोषाधिकारी अकल्पिता देवधर यांचेकडे किंवा मंडळाच्या कार्यकारिणीच्या कुठल्याही सभासदाकडे द्यावा. अथवा मंडळाच्या बँक खात्यामध्येही आपण तो भरू शकता. सोबत बँकेचा खाते क्रमांक आणि इतर तपशील देत आहोत.

आपले सर्व उपक्रम (आनंद मिळावे, वार्षिक सर्वसाधारण सभा, मंडळाच्या वेबसाईटचा खर्च, वार्षिक स्नेहसंमेलन, आपत्ती निवारण निधी, वैद्यकीय मदत निधी, शैक्षणिक मदत, वाटचाल छपाई व वितरण) यशस्वीरित्या राबविण्यासाठी हा संवर्धन निधी उपयोगी पडणार आहे आपल्या सक्रिय सहभागातून मंडळाची वाटचाल यशस्वीपणे सहजसाध्य होईल हे निश्चित.

आपणास नम्र आवाहन आहे की आपण आपला संवर्धन निधी मंडळाकडे लवकरात लवकर जमा करावा. बँकेत जमा केल्यास त्याचा screenshot काढून कोषाधिकारी अकल्पिता देवधर यांना पाठवावा म्हणजे त्याची नोंद करणे सुलभ होईल.

लवकरच सुरू होणारे २०२३ हे वर्ष आपणा सर्वांना आनंदाचे सुखाचे समृद्धीचे भरभराटीचे आणि आरोग्यदायी जावो अशी श्री केशवराज चरणी प्रार्थना!

**- सरिता मुकुंद देवधर**
कार्यवाह, देवधर मंडळ

मंडळाच्या बँक खात्याचा तपशील
नाव : देवधर मंडळ मध्यवर्ती
Deodhar Mandal Madhyavarti

१) बँक : बँक ऑफ महाराष्ट्र
शाखा : पाथर्ली शाखा, डोंबिवली
खाते क्र. : 60023916021
IFSC : MAHB0000536

२) बँक : आयडीबीआय बँक
शाखा : टिळक चौक, कल्याण
खाते क्र. : 45310010007645
IFSC : IBKL0000456

***

---

पान क्र. ३ वरून ....

अर्थाने प्रगतीची होते त्यामुळे आपला आनंद अनेक पटींनी वाढतो संकट समई एकमेकांना मदत करण्याची प्रेरणा मिळते

अशा प्रकारचे आनंद मेळावे पंढरपूर, नागपूर, इंदूर, नाशिक अशा अनेक ठिकाणी आयोजित करण्याची इच्छा आहे. परंतु त्यासाठी स्थानिक कुलबंधूंनी पुढाकार घ्यायला हवा.

एकमेका साह्य करू अवघे होऊ समर्थ आणि श्रीमंत.

येणारे नवीन वर्ष आपणा सर्वांना सुखासमाधानाचे, आरोग्यदायी आणि आनंदाचे जाओ हीच केशवराजचरणी प्रार्थना!

**- सुरेश देवधर**
अध्यक्ष, देवधर मंडळ

***

# गप्पागोष्टी आणि बरंच काही

**स्थळ :– टिळक नगर विद्यामंदिर, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व)**

**दिनांक – शनिवार, ५ नोव्हेंबर २०२२, वेळ – संध्याकाळी ४ ते ९**

**– समीर सुरेश देवधर (डोंबिवली)**
मोबाईल : ९८३३१४८४८५

कल्याण, डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ आणि आजूबाजूच्या परिसरात जवळजवळ १५० देवधरांची घरं आहेत असं मी ऐकून आहे. पण 'खरंच मी किती लोकांना ओळखतो?' हा प्रश्न मला नेहमी पडतो. देवधर, दीक्षित आणि ढमढेरे एका सगळे एका कुळातलेच असल्याने काही पिढ्या मागे गेलो तर नक्कीच आपण सगळे सख्ख्या नात्यांमध्ये असणार आहोत. मग एकाच गावात किंवा जवळपास राहणाऱ्या एवढ्या कुलबंधू बांधवांबद्दल आपल्याला काहीच माहिती नाहीये. गेल्या पाच सहा वर्षांमध्ये देवधर मंडळाच्या अनेक कार्यक्रमाना मी उपस्थित राहिलो आहे. पूर्वी फक्त सभासद म्हणून आणि नंतर कार्यकारणी सभासद म्हणून. त्यातूनच बऱ्याच देवधरांच्या ओळखी झाल्या; पण खरोखर परिचय झाला होता का? तर असा परस्पर परिचय होण्यासाठी स्थानिक पातळीवर एकत्र येणे गरजेचे आहे असे आम्हाला वाटत होते. वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याच्या निमित्ताने जेव्हा जेव्हा माझे बोलणे होते, तेव्हा बऱ्याच जणांच्या बोलण्यातून मला असे जाणवले की सगळ्यांनाच वेगवेगळ्या गावात असलेल्या स्नेहसंमेलनांना उपस्थित राहायला जमतेच असे नाही. पण जर गावातल्या गावातच काही कार्यक्रम केला तर कसा प्रतिसाद मिळेल, असा प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे ? असा विचार आम्ही केला. डोंबिवलीमध्ये असा कार्यक्रम कया असे आमच्या मनात आले. आम्ही म्हणजे अकल्पिता, विष्णू, मी आणि पूर्वा. पूर्वाने गिरगावात एवढ्या लांब राहून सुद्धा या कार्यक्रमाचा खूप कार्यभाग सांभाळला.

आता असा कार्यक्रम करायचा तर किमान ५० लोकांची उपस्थिती तरी अपेक्षित धरायला हवी होती. त्यासाठी योग्य जागा बघणे आले, खाण्यापिण्याची व्यवस्था आली, चार ते पाच तासांमध्ये काय काय कार्यक्रम करायचे याचा विचार आला. अशा बऱ्याच गोष्टींवर आमच्या चौघांच्या सतत चर्चा होत होत्या. हा कार्यक्रम स्थानिक पातळीवरचा आणि स्वखर्चाने करायचं हेच डोक्यात होतं. मंडळावर कुठल्याही प्रकारचा भार आम्हाला टाकायचा नव्हता. आणि शक्य असेल तिथे आपल्यातल्या लोकांना पुढे आणायचं हा ही विचार मनात होता. ओमकार देवधरशी ओळख झालीच होती आणि तो कॅटरिंगच्या व्यवसायात आहे, त्यामुळे त्यालाच खानपानाची व्यवस्था द्यायची हेही मनात होतं. बहुतेक सगळ्या हॉलमध्ये त्यांचा कॅटरर फिक्स असतो. तिथले कॉन्ट्रॅक्ट त्यालाच द्यायला लागते. तेव्हा आमच्या टिळक नगर शाळेचा हॉल घेतला तर तसे भाडेही खूप कमी पडेल आणि तिथे आपला कॅटरर आणता येईल म्हणून तिथे कार्यक्रम करावा असे ठरले. वृषाली विष्णू देवधर टिळक नगर शाळेतच शिक्षिका असल्याने संबंधित लोकांशी

बोलून आम्हाला हव्या त्या तारखेला हॉलचे बुकिंग करण्याचे काम तिने केले. दिवाळीच्या सुट्ट्या संपायच्या आत जर कार्यक्रम केला तर उपस्थिती चांगली असेल असा साधारण लोकांचा कल दिसला. त्याप्रमाणे आम्ही तारीख ठरविली. साधारण दीड ते दोन महिने आधी आम्ही कार्यक्रमाची रूपरेषा तयार केली होती. मुद्दाम त्याला 'गप्पागोष्टी आणि बरंच काही' असंच नाव दिलं होतं. कारण तोच उद्देश होता. जास्तीत जास्त लोकांनी एकत्र यावं. एकमेकांशी मनमोकळ्या गप्पा माराव्या. कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, डोंबिवलीतल्या लोकांना वैयक्तिक मेसेज पाठवण्यात आले. तसेच बऱ्याच जणांशी वैयक्तिक बोलणेही होत होते. ठाणे, पनवेल, मुंबई, नवी मुंबई इथे राहणाऱ्या बांधवांना सुद्धा डोंबिवलीला येणे तसे सोयीस्कर पडेल म्हणून तिथल्या लोकांनाही मेसेज पाठवले. सुरुवातीला तसा प्रतिसाद कमी दिसत होता. ५० जणांची तरी उपस्थिती होते की नाही अशी शंका मनात यायला लागली. कारण दिवाळी नुकतीच होऊन गेल्याने बरेच जण बाहेर फिरायला जात आहेत असे कळत होते. पण जसा जसा कार्यक्रमाचा दिवस जवळ येत गेला, तशी तशी संख्या वाढत गेली. लोकांनी आपापली नावे नोंदवून पैसेही पाठवायला सुरुवात केली. जवळजवळ ४५ पेक्षा जास्त कुटुंबातून ८५ लोकांनी नाव नोंदवून पैसे भरले. संध्याकाळी आठ साडेआठ नंतर घरी गेल्यावर जेवणाचं कधी करणार म्हणून पोटभरीचाच मेनू ठरवायचा होता. खरोखरच ओमकार देवधरने अतिशय चविष्ट जेवण खूपच वाजवी दरात दिले.

कार्यक्रमाची रूपरेषा कशी असावी, कोणी कधी, काय बोलावं, कुठला कार्यक्रम आधी, कुठला कार्यक्रम नंतर, ह्या सगळ्याची जबाबदारी पूर्वाने खूप सुंदर पार पाडली. कार्यक्रम डोंबिवलीत असल्याने, यजमान डोंबिवलीकर असल्याने कार्यक्रम सुरू होताना सर्वांचे स्वागत करणे ही जबाबदारी मला दिली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजिरी देवधर आणि वृषाली देवधर यांनी खूप सुंदररित्या पार पाडले. अकल्पिताने स्वखर्चाने या कार्यक्रमाकरिता दोन बॅनर तयार केले. एक हॉलमध्ये आणि एक खाली गेटवर लावला होता. या पुढच्याही विविध ठिकाणच्या आनंद मेळाव्यासाठी त्याचा उपयोग होईल. शिल्पा देवधर, डोंबिवली आणि मंजुषा देवधर, मुलुंड या दोघींनी नावनोंदणीची जबाबदारी छान सांभाळली.

मंडळाचे अध्यक्ष माननीय श्री. सुरेश देवधर काका स्वतः उपस्थित राहू शकत नसले तरी काम करू इच्छिणाऱ्या पुढील पिढीस नेहमीच प्रोत्साहन देत असतात. या वेळेस देखील त्यांनी थेट ऑस्ट्रेलियातून आपल्या शुभेच्छा आणि मंडळाचे अध्यक्ष या नात्याने छोटेसे मनोगत पाठवले, तसेच या कार्यक्रमाबद्दल सर्व स्वयंसेवक व उपस्थितांचे कौतुक देखील केले... सुगंधा काकूंनी एक छान कविता पाठवली होती.

स्थानिक ज्येष्ठ नागरिकांकडून श्री केशवराजाची पूजा आणि आरती करून त्यानंतर दिवंगतांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

परस्पर परिचय सुरू झाल्यावर मंजिरीने सगळ्यांना सांगितले की फक्त औपचारिक ओळख करून देऊ नका, स्वतःची, आपल्या व्यवसायाची माहिती सांगितल्यावर आपल्या आवडीनिवडी आणि छंदही सांगावेत त्यामुळे समान आवडीनिवडी, छंद असतील तर ओळख वाढायला आणि दृढ व्हायला मदत होते. त्यानुसार खरोखरच खूप छान परिचय झाला सगळ्यांचा. संपूर्ण कुटुंब

पुढे येऊन आपला परिचय देत असताना समोर प्रेक्षकांत सुद्धा काही छान छान कमेंट होत होत्या आणि त्यामुळे कार्यक्रमाला लज्जत प्राप्त होत होती. अविनाश देवधर काका डोंबिवलीतल्या अनेक देवधरांना खूप चांगल्या प्रकारे ओळखतात. त्यामुळे मधेमधे त्यांनी पुढे येऊन, त्या विशिष्ट व्यक्तींची विशेष ओळख काय आहे ते सुद्धा सांगितले आणि लोकांना अधिक माहिती पुरविली. ४० - ४५ कुटुंबांची माहिती सांगताना हा कार्यक्रम जवळजवळ दोन तास रंगला. एका कुटुंबातून जास्तीत जास्त सदस्य येण्याचा विक्रम दिलीप काका देवधर यांच्या नावावर लागला. त्यांच्या घरातून सात जण आले होते. त्या खालोखाल नरेश दीक्षित काका, त्यांच्याकडून पाच जण उपस्थित होते.

काही बंधू भगिनी देवधरांच्या कार्यक्रमाला / गेट-टुगेदरला पहिल्यांदाच उपस्थित राहत होत्या. त्यांनी खूप छान मनोगत व्यक्त केले. त्यातीलच एक डोंबिवलीतला केयूर देवधर. तो म्हणाला ''मै यहा लाया गया हू'' त्याच्या या वाक्याने मस्त हशा पिकवला. त्या मागचे कारण म्हणजे त्याची बायको शिल्पा आधी दोन-तीन कार्यक्रमाला आलेली आहे. त्याला सुद्धा हा कार्यक्रम खूप आवडला. पहिल्यांदा आलेल्या सर्वांनीच सांगितले की, ''असे कार्यक्रम नेहमी करत जा. ''

डिसेंबर महिन्याच्या १७-१८-१९ तारखेला आम्ही काही कुलबंधुभगिनी श्री केशवराज दर्शनासाठी जाणार आहोत. विष्णू देवधर नी या सहलीची सविस्तर माहिती दिली आणि ज्यांना यायचे असेल त्यांना संपर्क करायला सांगितला.

जे कुल बंधुभगिनी कार्यक्रमाला उपस्थित राहू शकणार नाहीत त्यांच्या सोयीसाठी हा कार्यक्रम एफ बी लाईव्ह केला होता. ती तांत्रिक जबाबदारी सर्वतोपरी आशुतोष देवधरने पार पाडली. अजूनही कोणाला हा कार्यक्रम बघायचा असल्यास खालील एफबी लिंक वर जाऊन तो बघू शकता.

https://m.facebook.com/s/1383743438825114?view=permalinkid=1384341792098612mibextid=Nif5oz

डोंबिवलीतले ज्येष्ठ श्री. सुरेश बापूराव देवधर, नरेश दीक्षित आणि अविनाश देवधर यांनी डोंबिवलीतल्या आधीच्या संमेलनाच्या काही आठवणी सांगितल्या. या जुन्या आठवणींना उजाळा देताना त्या तिघांनाही भरून आले. कंठ दाटून आला.

मंडळात गेली अनेक वर्षे अनेक पदाच्या जबाबदाऱ्या सांभाळलेले श्री. दिलीपकाका देवधर यांनी मंडळाच्या आत्तापर्यंतच्या वाटचालीबद्दल आठवणी सांगितल्या.

कोषाध्यक्ष अकल्पिताने मंडळाच्या अनेक उपक्रमांची माहिती दिली. नवीन सभासद होण्यासाठी आणि असलेल्या सर्व सभासदांनी संवर्धन निधी का भरला पाहिजे याबद्दल योग्य आवाहन केले. काही सभासदांनी लगेच संवर्धन निधी भरला. नवीन सभासद होण्यासाठी पण सुरुवात झाली आहे.

काही बंधुभगिनी खरोखरच खूप लांबून आल्या होत्या. त्यांचे विशेष कौतुक करावेसे वाटले मला. निशा आणि केदार देवधर हे पेणहून आले होते. ज्योती आणि दीपक देवधर हे गोव्याहून आले होते. मनाली देवधर बेडेकर ही विरार होऊन आली होती. मी फक्त अर्धा तास बसेन आणि लगेच जाईन कारण मला खूप लांब जायचे आहे असे म्हणून ती आली होती. पण जेवण करूनच ती घरी गेली इतका तिला कार्यक्रम आवडला. ठाणे आणि मुंबईतल्या उपनगरातून सुद्धा काही कुल बांधवांनी

उपस्थिती लावली.

डोंबिवलीतील गीता दीक्षित, केदार देवधर, विनोद देवधर, मंजिरी देवधर, सुमित देवधर यांनी सुरेल गाणी म्हणून उपस्थित जनांचे फार सुंदर मनोरंजन केले. सौ. पुष्पा दीक्षित काकूंनी त्यांच्या दोन कविता सादर केल्या. केयूर देवधरने खूप सुंदर किस्सा सांगितला. वरदा केयूर देवधर, कौशिक केदार दीक्षित आणि वरद केदार देवधर या लहान मुलांनी देखील आपली कला सादर केली. कार्यक्रमाच्या शेवटी, पूर्वाने तयार केलेल्या, आपल्या हिंदू सणांवर आधारित असलेल्या काही लोकप्रिय गाण्यांच्या फ्युजन वर उपस्थित लहान मुलांना पुढे बोलवून पूर्वा देवधर गिरगाव, मंजुषा देवधर मुलुंड आणि मंजिरी देवधर डोंबिवली यांनी त्या मुलांबरोबर खूप धमाल नाच सादर केला. उपस्थित लोकांचे आणि कार्यक्रमाच्या आयोजनात मदत केलेल्या सर्वांचे आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता झाली. ओमकार देवधरने आणलेल्या चविष्ट पावभाजी, ताक आणि गुलाबजाम याचा लोकांनी मनसोक्त आस्वाद घेतला. संपूर्ण कार्यक्रमाला आणि चविष्ट जेवणाला मनापासून दाद देऊन आणि पुन्हा भेटू अशाच कार्यक्रमाला असे सांगून सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला.

अशा प्रकारचे स्थानिक पातळीवरचे कार्यक्रम वेगवेगळ्या शहरांमध्ये जर आयोजित केले तर खरोखरच लोकांचा एकमेकांशी छान परिचय होईल, ओळख वाढेल, एकमेकांना मदत होईल.

***

# वाटचाल वितरण संबंधी निवेदन

नमस्कार मंडळी.

आपलं वाटचाल त्रैमासिक पोस्टाद्वारे पोहोचण्यास बऱ्याचदा खूप उशीर होतो किंवा मिळतच नाही अशा तक्रारी येतात. म्हणून ऑनलाइन पर्याय ही उपलब्ध केला आहे. आपल्या व्हाट्सअप च्या सर्व समूहांत ऑनलाईन वाटचाल ही पाठवला जातोच. पण तरीही इतर अनेक पोस्ट्सच्या गर्दीत तो पटकन पाहिला जात नाही. (miss होतो)

ज्या सभासद कुलबांधव आणि भगिनींना फक्त ऑनलाइन च पाठवून हवा असेल त्यांनी खाली दिलेल्या व्हाट्सअप क्रमांकावर व्हाट्सअप मेसेज करावा. अथवा ईमेल आयडीवर इ मेल पाठवावा.

त्या मेसेज मध्ये तुमचं संपूर्ण नांव, संपूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी ही संपूर्ण माहिती नमूद करावी. वाटचाल अंक तुमच्या ई-मेल आयडीवर पाठवायचा आहे की व्हाट्सअप क्रमांकावर पाठवायचा आहे ते कृपया स्पष्ट लिहावे. आपण निवडलेला हा पर्याय कायमस्वरुपी असेल, त्यानंतर त्यात शक्यतो बदल करू नये. ह्याची कृपया नोंद घ्यावी. ही नम्र विनंती. धन्यवाद

-पूर्वा देवधर.

९८६९९३९०७२

येथे फक्त मेसेज पाठवणे, (फोन करु नये)

अथवा

purdeo.77@gmail.com

# समर्पित व्यक्तिंची भेट

**– काशिनाथ देवधर**

आमचं पंढरपूरकर देवधर कुटुंब म्हणजे १५० - २०० माणसांचं. त्या कुटुंबात एकच आनंदाची लहर पसरली. त्याचं कारण म्हणजे माझे मोठे चुलत भाऊ, मा.सदाशिवराव देवधर व मा.पंतप्रधान मोदी यांची भेट ठरली.

काय नातं या महान व्यक्तींचं? कारण, ही भेट एकमेकांची आपुलकीने चौकशी करून, एकमेकांसाठी शुभचिंतन व्यक्त करण्यासाठी होती. ना कोणतं निवेदन, ना मागणीपत्र. मात्र दोघांच एकच स्वप्न वैभवशाली भारताचं.



मा. सदाशिवरावांच्या कामाचा आलेख आणि व्याप्ती खूप मोठी. स्वातंत्र्यपूर्व काळात जन्म झाला, तो जणू देशसेवेचं बाळकडू घेऊनच.

१९६८ साली प्राध्यापक म्हणून नोकरी करीत असताना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची धुरा सदाशिवरावांनी खांद्यावर घेतली आणि नोकरीपासून परावृत्त झाले. अनेक मोठ्या जबादाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या. अनेक युवा कार्यकर्ते तयार केले. १९९९ पासून वनवासी कल्याण आश्रमाच काम सुरू झाले. मिळेल त्या सार्वजनिक वाहनाने भारतभर संपर्क सुरू झाला.

साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे सदाशिवरावांच्या व्यक्तिमत्वाला तंतोतंत लागू पडतं. साधी राहणी, पत्र लिहिण्याची अनोखी शैली, सुंदर अक्षर, त्यामुळे त्यांनी अनेक लोकांना आपलेस केले. 'माणूस नावाचं काम' हे त्यांनी आपल्या गुरूस्थानी असलेल्या यशवंतराव केळकर यांच्या जीवनावर लिहिलेल्या पुस्तकात आपल्या गुरुंच्या व्यक्तिमत्वाच्या अनेक पैलूंवर आदरयुक्त सुंदर शब्दांकन केले आहे.

राजकोट येथील मुख्यालयात सदाशिवराव काम करत होते, तेव्हा मा. मोदी तिथे संघ प्रचारक होते. तेव्हा ते एकमेकांच्या संपर्कात होते, परिचित झाले होते. एकमेकांच्या कामाची माहिती झाली होती आणि सदाशिवरावांच्या कामाची व्याप्ती मा. पंतप्रधानांना माहिती होती. त्याची आठवण ठेवून मा. मोदींनी त्यांना भेटीसाठी बोलावलं होतं. अशी आस्था असणारे पंतप्रधान भारताला लाभणं सौभाग्यंच आहे.

मोदीजी 'मन की बात' मधून सुध्दा चांगलं काम करणाऱ्या व्यक्तिंचा आवर्जून उल्लेख करून कौतुक करतात. त्यामुळे मा. पंतप्रधान व सदाशिवराव देवधर यांची भेट म्हणजे दोघांसाठी आनंदाचा क्षण होता. दोघांची विचारधारा एक आणि दोघांच्या डोळ्यासमोर दैदिप्यमान भारत.

मा. मोदींनी त्यांच्या या कार्याची महती लक्ष्यात ठेवून सदाशिवरावांना मुद्दाम आमंत्रण दिलं. उदात्त वेगळेपण ह्या दोन्ही व्यक्तींमधे आहे.


सदाशिवरावांची मा. पंतप्रधान मोदी यांच्याशी झालेली भेट ही आमच्या फक्त देवधर परिवारालाच नाही तर अभाविप व वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्यकर्ते यांना सुद्धा प्रेरणादायी आहे.

या महान देशभक्तांना त्रिवार वंदन!

***

# शब्दकोडे

- रचनाकार : **श्री. पु. गो. देवधर,** पुणे




**आडवे शब्द :–**

१) राणा ✻✻✻ ४) मागील जन्मीचे पाप/पुण्य कर्म ५) इस्टेट/मालमत्ता ८) तेज ९) धार लावण्याचे साधन १०) वडील/बाबा ११) खोडकर १२) मौज १४) हाक १८) वाराणसी १९) सैल/द्रवरूप २१) भार २३) चिवट २४) देवघरातील मंद दीप २६) नागाचे मुख २७) थडगे २९) मिठाची चव ३१) पैसा/द्रव्य ३२) टोळीचा नेता

**उभे शब्द :–**

१) जाणे २) पूर्ण कागद ३) निराधाराची अवस्था ४)सकाळ ५) त्यासारखा ६) सूर्योदय ८) वर्तमानकाळ ११) एकादशी नंतर १३) समजणे १४) गाळ / उरलेला घट्ट पदार्थ १५) धबधबा १६) शक्ती १७) शरीर / काया २०) पाण्याशिवाय माशाची अवस्था २२) उत्तरदायित्व असणारा २३) चांगल्याच्या उलट २४) मित्र २५) जीव जाणे २८) विदेशी मद्य ३) पुरुष

(उत्तरे इतरत्र)

# अण्वस्त्र, तंत्रज्ञान आणि भारत

– काशिनाथ दामोदर देवधर

बुद्ध पौर्णिमा १९९८, ११ मे या दिवशी दुपारी राजस्थानमधील थार वाळवंटात पोखरण येथे भारताने तीन अणुस्फोट चाचण्या यशस्वी केल्या व आणखी दोन चाचण्याही १३ मे १९९८ या दिवशी परत यशस्वी करून भारत अण्वस्त्रधारी देशांच्या मानाच्या पंक्तीत जाऊन बसला. आता भारताजवळ सर्व प्रकारचे, लहान मोठे अणुबॉम्ब बनविण्याचे स्वतःचे तंत्रज्ञान आहे. शक्तिशाली देश म्हणून भारत स्वतःचे स्थान निर्माण करून विकसित भारताचे स्वप्न साकार करत आहे.

११ मे १९९८ या संध्याकाळी भारताचे तत्कालीन पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयीजी यांनी घोषणा केली की, ''भारताने अणुबॉम्बच्या यशस्वी चाचण्या करून, भारत 'अण्वस्त्रधारी देश' बनला आहे.'' फ्रान्स वगळता बहुतेक देशांनी भारतावर बहिष्कार (Sanctions) टाकला व भारताला जगामधे एकाकी पाडण्याचा प्रयत्न केला. तरीही न डगमडता, आंतरराष्ट्रीय दबावाला भीक न घालता मा. अटलजींच्या कणखर नेतृत्वाने पुढील चाचण्यांना परवानगी दिली आणि १३ मे या दिवशी आणखी दोन यशस्वी चाचण्या करून जगामधे एक 'समर्थ भारत'चा संदेश दिला. आशियाई क्षेत्रात शक्ती संतुलन राखणे व चीनच्या विस्तारवादी मनमानीला शह देणे, आळा घालणे यासाठी या अणुचाचण्या आवश्यकच होत्या.

विशिष्ट पदार्थांच्या अणुकेंद्रकांवर न्यूट्रॉनचा मारा केल्यास अणुकेंद्र अस्थिर होते व प्रचंड ऊर्जा वेगाने बाहेर पडते व स्फोट होतो या भौतिक शास्त्रातील सिद्धांताचा उपयोग करून अणुबॉम्ब बनवतात. १६ जुलै १९४५ या दिवशी न्यू मेक्सिकोत अला मोंगोर्डी येथे अशा अणुबॉम्बचा प्रायोगिक स्फोट अमेरिकेने केला होता. ६ ऑगस्ट १९४५ या दिवशी युरेनियम पासून बनविलेला 'लिटिल बॉय' नावाचा अणुबॉम्ब जपानच्या हिरोशिमा या शहरावर अमेरिकेने टाकून पहिल्यांदा उपयोग केला. तसेच ९ ऑगस्ट १९४५ रोजी 'फॅटमॅन' हा प्लुटोनियमचा उपयोग करून बनविलेला दुसरा अणुबॉम्ब जपानच्या नागासाकी शहरावर टाकून हाहाकार घडवला. एक लाखाहून अधिक नागरिक मृत्यूमुखी पडले, तर लाखो लोक जखमी झाले. अशा भयानक अति विनाशकारी अणुबॉम्बमुळे दुसरे महायुद्ध थांबले. सर्व देशांनी एकत्रित येऊन याचा उपयोग करण्याला बंदी घातली तरीही अमेरिका, रशिया, चीन, इंग्लंड, फ्रांस या देशांकडे अणुबॉम्बचे साठे आहेत. त्यामुळे भारताकडेही हे तंत्रज्ञान असणे गरजेचेच होते. डॉ. राजा रामण्णा यांच्या शास्त्रज्ञ गटाने १९७४ मधील बुद्ध पौर्णिमेला पोखरण येथील वाळवंटात पहिला प्रायोगिक अणुस्फोट केला व यशस्वी झाला. त्याचे सांकेतिक नाव होते 'हसरा बुद्ध (Smilling Buddha)'

वशिष्ट प्रकारची मूलद्रव्ये, जी किरणोत्सारी गुणधर्माची असतात उदा. युरेनियम, प्लुटोनियम अशा व त्यांच्या समस्थानिकांच्या केंद्रकांवर

न्यूट्रॉनचा मारा केला असता, प्रचंड ऊर्जा बाहेर पडते व मूळ भारी मूलद्रव्यातून दोन वेगळे अणू/रेणू तयार होतात व काही न्यूट्रॉन मुक्त होतात त्या प्रक्रियेस ''अणू विखंडन (fission) असे म्हणतात. मुक्त न्यूट्रॉन जवळच्या दुसऱ्या अणुकेंद्रकावर वेगाने धडकतात व त्या अणुचे विखंडन होते व ही प्रक्रिया सुरू राहते. याला शृंखला प्रक्रिया (Chain reaction) म्हणतात. अणुऊर्जा प्रकल्पामधे ऊर्जा मिळवण्यासाठी अणुभट्टीत हीच श्रृंखला प्रक्रिया चालू असते.

या एक प्रकारच्या बॉम्बस्फोटातही याच क्रियेचा उपयोग होतो व या प्रकारच्या अणुबॉम्बला 'परमाणु बॉम्ब' म्हणतात. तो 'अणू विखण्डन प्रक्रियेवर (Nuclear Fission) आधारित असतो. एकूण युरेनियमपैकी समस्थानिक $U^{238}$ ची निसर्गामध्ये ९९.३% उपलब्धता आहे. व $U^{235}$ केवळ ०.७% उपलब्ध आहे. $U^{235}$ चे विखंडन तुलनेने सहज होते व $U^{238}$ चे सुलभतेने विखंडन होत नाही. अण्विक शृंखला प्रक्रिया सुरू होण्यासाठी क्रांतिक संहती (critical mass) ची आवश्यकता असते. दुसऱ्या प्रकारचा अणुबॉम्ब हा अणुसंलयन (Fusion) प्रक्रियेद्वारे होतो. या क्रियेमध्ये दोन अणु/रेणू उच्च दाब व अत्यच्च तापमान यामुळे जोडले जातात व वेगळे मूलद्रव्य तयार होते.

उदाहरणार्थ हायड्रोजनची समस्थानिके $H^2$ व $H^3$ ही एकत्र येऊन हेलियममध्ये रूपांतरित होतात. $H^2$ म्हणजे ड्यूटेरियम व $H^3$ म्हणजे ट्राईटिरियम यांना प्रचंड दाब व उच्च तापमानामध्ये एकत्र आल्यास ''अणु संलयन'' (Fusion) क्रिया होऊन हेलियम तयार होतो व खूप प्रचंड प्रमाणावर ऊर्जा बाहेर पडते. ज्या मुळे विनाशकारी स्फोट होतो. याला हायड्रोजन बॉम्ब म्हणतात. अणुसंलयन ही प्रक्रिया सर्व ताऱ्यांच्या पृष्ठभागावर व आतमध्ये गर्भात सतत सुरू असते. उदा. आपल्या सूर्याच्या गर्भात.

दोन्ही प्रकारच्या अणुबॉम्बचा स्फोट हा महाविनाशकारी असतो. त्यामुळे प्रचंड ऊर्जा मुक्त होते. ती आघात तरंगे (Shock Waves), वेधी किरणे (Nuclear radiation) आणि विस्फोट (Bomb Blast) परिणामी तीव्र उष्मा व उच्च दबाव असणाऱ्या वायूंमुळे जीवित पेशी (सर्व प्राणिमात्रे व वृक्षादी) विनाश पावतात. त्यामुळे ''परमाणू बॉम्ब'' जो ''अणू विखंडन'' तत्त्वावर आधारित असतो व ''हायड्रोजन बॉम्ब जो अणु संलयन'' तत्त्वावर आधारित असतो, या दोघांचीही 'महाविनाशकारी शस्त्रास्त्रां'मध्ये गणना होते.

१९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धात पारंपारिक स्फोटकांचा उपयोग करून बनविलेला त्या वेळचा ज्ञात 'Block Buster' हा सर्वात मोठा बॉम्ब ''११ टन TNT' वापरून बनवला होता व त्याचा स्फोटाने केलेल्या विनाशाच्या २००० पट शक्तिशाली स्फोट या प्रथम अणुबॉम्बचा होता म्हणजेच '२२००० टन TNT' वापरल्यावर जेवढा विनाश झाला असता तेवढा विनाश या पहिल्याच अणुबॉम्बने केला. म्हणून अणुस्फोटाची शक्ति मोजण्यासाठी एक किलो टन TNT' हे एकक वापरतात १९४५ ते २०२२ इतक्या मोठ्या कालखंडात खूप प्रगती झालीय व अद्ययावत तंत्रज्ञान विकसित झालंय. त्यामुळे त्या वेळेपेक्षा कितीतरी अधिक पट शक्तिशाली अणुबॉम्ब तयार झालेत. त्यामुळे सर्व सृष्टी/पृथ्वीच नष्ट होईल काय? ही भीती आहेच. तरीही

अणुहल्ल्यांपासून बचाव करणे, सर्व नागरिक सुरक्षित राहण्यासाठीची व्यवस्था, अण्वस्त्र संपन्न देश समर्थ भारत'' ही शक्ति संपन्नता भारताला महाशक्ति बनण्यास आवश्यक आहे हे लक्ष्यात घेऊन भारत अण्वस्त्र सिद्ध झाला.

भारताचे एक महान शास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा. त्यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात पाश्चिमात्य देशात काम करून, जवळून अनुभव घेतले. परंतु 'आपला देश एक शक्तिशाली अण्वस्त्र संपन्न देश झाला पाहिजे' हे एक ध्येय घेऊन ते आपल्या मायदेशी, भारतात परत आले आणि स्वतंत्र भारतामध्ये अणुऊर्जा व अण्वस्त्र क्षेत्रात कामाची मुहूर्तमेढ रचली. अतिशय गोपनीय असे तंत्रज्ञान विकसित करणारे डॉ. होमी भाभा हे भारतीय अणुऊर्जा आयोगाचे संस्थापक अध्यक्ष झाले. अक्षरश: शून्यातून त्यांनी भारतीय अणू तंत्रज्ञान, सर्व अणुऊर्जा संस्थांसह निर्माण केल्या, उभ्या केल्या. तसेच अवकाश क्षेत्राच्या कामासही डॉ. विक्रम साराभाई यांना आधार दिला. आज अणुऊर्जा व अवकाश या दोन्ही क्षेत्रात उत्तुंग भरारी भारताने घेतल्याचे लक्ष्यात येते. या मागे असलेल्या त्यांच्या व त्या काळातील सर्व सहकारी शास्त्रज्ञांच्या अथक कार्यास अभिवादन.

डॉ. व्ही. जी. भिडे भारत सरकारचे वैज्ञानिक सल्लागार असताना, १९७४ मध्ये डॉ. राजा रामण्णा यांच्या गटाने ८-१० किलोटन TNT चा प्रथम प्रायोगिक अणुस्फोट दि. १८ मे रोजी पोखरणला केला. त्याचे सांकेतिक नाव होते ''हसरा बुद्ध'' (Smilling Buddha)''. हा स्फोट शांततेसाठी केला असे सांगण्यात आले. मात्र अणबॉम्ब तंत्रज्ञान अद्ययावत व अत्याधुनिक करण्यासाठी संशोधन निरंतर सुरूच होते. मात्र आंतरराष्ट्रीय दबावामुळे पुढे २४ वर्षांत आपण चाचण्या घेऊ शकलो नव्हतो, हा आंतरराष्ट्रीय विरोध पूर्णपणे झुगारून देऊन तत्कालीन पंतप्रधान मा. अटलबिहारी बाजपेयी यांनी अणुबॉम्ब चाचण्यांना परवानगी दिली. अमेरिकेने व सर्वच पुढारलेल्या देशांनी भारताला 'सुपर कॉम्पुटर' नाकारला होता. तरीही भारताने डॉ. विजय भटकर यांच्या नेतृत्वामधे CDAC च्या माध्यमातून 'परम संगणक' स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करून स्वदेशी सुपर कॉम्पुटर बनवला. त्याचा उपयोग करून भारतीय अणुशास्त्रज्ञांनी अणुबॉम्बचे 'संगणकीय अनुरूपण Computer Simulation द्वारे सर्व तंत्रज्ञान प्रारूप अनुरूपण' (Modelling and Simulation) या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रत्यक्ष स्फोट चाचणी न करता सर्व घटक, निकष लावून त्याचे परिणाम (Results) मोजता येतात, सिद्ध करता येतात. यासाठी स्वदेशी तंत्रज्ञानाधारित व विकसित 'परम संगणक' या द्वारे हे शक्य झाले.

अणुचाचण्या करण्याचा निर्णय पंतप्रधान अटलजींनी दिल्यावर अणुऊर्जा विभाग प्रमुख डॉ. आर चिंदबरम रक्षा अनुसंधानन विकास संघटन प्रमुख डॉ.ए.पि.जे अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वामधे व BEG या भूसेनेच्या Bengal Enginnering Group च्या ११३ अभियांत्रिकी वाहिनी (113 Engg. Regiment) यांनी १९८१-८२ दरम्यान चाचण्यांसाठी जुळी भुयारं (Twin Shafts) २०० मीटर पेक्षा खोल अशी केली होती. मात्र अमेरिकी दबावामुळे ते काम अर्धवट सोडलं होतं. १९९५-९६ मध्ये सुद्धा कॉंग्रेस सरकारने परत प्रयत्न केला होता; पण परत

अमेरिकी गुप्तहेरी उपग्रह (Spy Satellite) च्या नजरेत आले व CIA कडेही या चाचण्यांसंदर्भात माहितीची गोपनीयता राहिली नाही व परत चाचण्या घेण्याची योजना बंद डब्यात पडून राहिली. १९९८ मध्ये मा. अटलजींच्या अनुमती नंतर गोपनीयता राखणे ही खूप मोठी समस्या होती. हेच मोठे आव्हान घेऊन अतिशय विपरित परिस्थितीत एक्कावन्न अंश सेल्सिअस इतक्या तीव्र तापमानात शत्रूंना सुगावा लागू न देता सहा जुनी भुयारे पोखरणच्या वाळवंटात केवळ रात्री काम करून आणि शत्रू उपग्रहांच्या नजरा चुकवून, गुप्तता पाळून हे काम करणं जिकिरीचे होते. उपग्रहाद्वारे सतत एका अर्थी पहाराच होता १९७४ मध्ये कोणासही ठिकाणाची व क्षमतेची कल्पना नव्हती, पण पहिल्या स्फोटामुळे भारताची अण्वस्त्र क्षमता व पोखरणचे ठिकाण सर्वांनाच माहिती झाले होते. म्हणून तिथे पाळत अधिक ठेवण्यात येत होती. १९८०-८१ व १९९५-९६ या वर्षी त्या संबंधीची हालचाल पकडली जाऊन, दबाव आणून अणुचाचण्या बंद केल्या होत्या. १९९८ मध्ये शास्त्रज्ञांनी व भारतीय सैन्यदलातील अभियांत्रिकीच्या तुकडीने वेगवेगळे मार्ग अवलंबून गुप्तता पाळली ज्यायोगे तिथे चाचणीच्या तयारीचा मागमूसही दिसायला नको.

सर्व शास्त्रज्ञ, तंत्रज्ञांना आपापल्या समकक्ष हुद्द्यांप्रमाणे सैनिकी गणवेश देण्यात आले. जेणकरून अन्य नागरिकांची वर्दळ सैन्यतळावर दिसणार नाही. डॉ. कलाम हे मेजर जनरल पृथ्वीराज म्हणून तर डॉ. आर. चिंदबरम हे मेजर जनरल नटराज म्हणून वावरत होते. दुसरे म्हणजे दोन सैन्य तुकड्यांमध्ये खेळाचे सामने उदा. फुटबॉल, हॉकी, क्रिकेट असे चाचणीच्या स्थळीच होत असत व गुप्त हेरगिरी करणाऱ्यांस व हेर उपग्रहाद्वारे सर्व नेहमी प्रमाणेच असल्याचा संदेश जाई. तसेच आकाश क्षेपणास्त्राच्या बालेश्वर चाचण्यांचा प्रोपोगंडा करून हेरांचे लक्ष्य भलतीकडेच जाईल हे पाहिले जाई.

११ मे १९९८ तीन व १३ मे ला दोन अशा पाच अणुचाचण्या यशस्वी केल्या. व जागतिक विरोधाला सक्षमपणे तोंड दिले.

अशा पाचही यशस्वी चाचण्यांनंतर आपल्याकडे सर्व प्रकारच्या अणुबॉम्बचे म्हणजे परमाणुबॉम्ब हायड्रोजन बॉम्ब, तसेच विमानाद्वारे गुरुत्व आधारित अथवा क्षेपणास्त्रेद्वारा डागले जाणारे, त्याचप्रमाणे तोफेने डागता येणाऱ्या तोफगोळ्यांच्या स्वरूपात ''सब किलोटन'' समतेच्या अणुबॉम्बचेही तंत्रज्ञान विकसित करून भारत देश जगाच्या पाठीवर 'समर्थ व सशक्तपणे' उभा आहे व विश्वगुरू भारताने महासत्तेच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे.
'' भारत माता की जय ।।

***

# फिगुरेसचा दाली

**– प्रा. गजानन देवधर,** डोंबिवली

दोन वर्षांपूर्वी स्पेनला जायचं योजलं. स्पेनला जायचं म्हणजे कला, रसास्वादासाठी पर्वणीच. बार्सिलोनापासून सुरुवात करायची असं ठरलं. आता बार्सिलोनाला जायचं म्हणजे थोडी वाकडी वाट करून फिगुरेसला जाणं अपरिहार्य. बार्सिलोनाच्या उत्तरेला १४० किमी अंतरावर असलेलं, ४५,००० लोकवस्ती असलेलं हे गाव. फ्रान्सच्या सीमेच्या अलीकडचं स्पेनमधलं त्यातल्या त्यात मोठं गाव. पण त्यापेक्षा फिगुरेसची खरी ओळख म्हणजे हे 'दालीचं गाव.'



कोण हा दाली? हा दाली म्हणजे विसाव्या शतकातील कलाकारांच्या मांदिआळीतील एक मोठं नाव, साल्वादोर दाली. त्याने आपल्या कलेने स्पेनच्या पिकासो, मिरो यांच्या पंगतीत स्थान मिळवलं. हा दाली फिगुरेसचा. १९०४ साली त्याचा जन्म इथेच झाला. लहानपणापासून त्याला कला शिक्षणाचा ध्यास. आईवडिलांकडून त्याला खूप प्रोत्साहन मिळालं. वयाच्या चौदाव्या वर्षी त्याच्या चित्रांचं पहिलं प्रदर्शन फिगुरेसच्या थिएटरमध्ये भरलं होतं. पुढे तो शिकायला माद्रीदला गेला. हटके वागणं हा त्याचा स्थायीभाव. कलेतील surrealist (नेहेमीचीच गोष्ट वेगळ्या पद्धतीने सांगणे) चळवळीचा तो एक पाईक. १९३१ साली त्यानं काढलेलं persistance of memory हे चित्र खूपच गाजलं. (आम्हाला ते न्यूयॉर्कमध्ये पाहायला मिळालं होतं.)

दालीने लग्न केलं एका रशियन युवतीशी, गालाशी. गाला ही त्याची प्रेरणा होती, त्याची मॉडेलही होती. कलेच्या क्षेत्रात दालीने अनेक प्रयोग केले. त्यानं खूप यश पाहिलं. चित्रकलेच्या बरोबरच त्याने शिल्पकला, छायाचित्रकला, चलतचित्रण ही माध्यमे सुद्धा समर्थपणे हाताळली. एवढेच नव्हे तर ज्वेलरी डिझाईनचे तंत्रही त्याने आत्मसात केले. अमेरिकेतील उचभ्रू समाजात काही काळ दालीने डिझाईन केलेली ज्वेलरी वापरण्याची क्रेझ होती.

आज जगातील अनेक गॅलरीजमध्ये त्याची चित्रे पाहायला मिळतात. परंतु त्याच्या स्वतःच्या संग्रहातील त्याच्या आणि त्याचबरोबर इतर काही चित्रकारांच्या अनेक कलाकृती पाहायला मिळतात त्या फिगुरेस येथेच.

१९६० साली फिगुरेसच्या महापौरांनी दालीशी चर्चा केली आणि दालीच्या कलाकृतींचे एक कायमस्वरूपी म्युझिअम फिगुरेस येथे असावे असे सुचविले. या कल्पनेस मूर्त रूप



येण्यास १९६८ साल उजाडले. रीतसर परवानगी मिळाली आणि दालीने आराखड्याला सुरुवात केली. ज्या थिएटरमध्ये दालीचे आयुष्यातील पहिले प्रदर्शन भरले होते, त्याच थिएटरमध्ये म्युझिअम उभारायचे निश्चित झाले.

थिएटरची वास्तू मध्यंतरीच्या युद्धाच्या काळात भक्ष्यस्थानी पडली होती. तिची दालीच्या हटके संकल्पनांप्रमाणे पुन्हा उभारणी केली गेली. आज उभ्या असलेल्या म्युझिअमच्या वास्तूची जगातील अनेक कल्पनांची, प्रतिमांची गुंतागुंत असलेली सर्वात भव्य वस्तू अशी नोंद होते. हे म्युझिअम पाहायला जाणे म्हणजे एखाद्या जत्रेला जाण्यासारखे आहे. फिगुरेसच्या गाला – साल्वादोर चौकात आल्यापासून आपण एका वेगळ्याच दुनियेत जातो. समोर 'एखाद्या परीकथेतील किल्ल्यापाशी तर आपण उभे नाही ना' असे वाटते. शेंदरी रंगाची भव्य तटबंदी आपले लक्ष्य वेधून घेते. त्या समोरील ख्रिसमससारख्या हिरव्यागार झाडांमुळे तो शेंदरी रंग जास्तच खुलून दिसतो. शेंदरी भिंतीवरील वेगळ्याच धाटणीची नक्षी पाहता पाहता आपले लक्ष्य जाते तटाच्या शिबंदीवर, त्यावरील भव्य अशा पांढऱ्याशुभ्र अंड्यांच्या मांडणीमुळे. त्यामागे आपले लक्ष्य वेधून घेतो सर्वात उंचीवर असलेला निळसर दिसणारा काचेचा भौगोलिक घुमट.( geodesic dome ).

म्युझिअमच्या आवारात गेल्यावर जगातील विविध देशातील प्रवाशांचा मेळावा भरला आहे की काय असे वाटते. खूपच गर्दी. त्यावरून दालीच्या लोकप्रियतेची कल्पनाही येते. आवारात "Rainy Taxi" हे प्रसिद्ध installation आहे. तसेच सभोवताली वरपासून खालपर्यंत अनेक कोनाड्यात academy award च्या असाव्यात अशा मूर्ती मांडलेल्या आहेत.

या म्युझिअममध्ये दालीच्या कारकिर्दीतील सगळ्याच कालखंडातील कलाकृती पाहायला मिळतात. आतमध्ये त्याचे Mae West हे istallation ही आहे. म्युझिअम पाहताना गाईडची मदत घेऊ नये अशी दालीची इच्छा होती. ज्याने त्याने आपल्या कल्पनेप्रमाणे कलाकृती interpret कराव्यात असे तो म्हणे. ह्या म्युझिअम मध्येच दालीच्या इच्छेप्रमाणे खाली तळघरात तो चिरनिद्रा घेत आहे.

ह्या जुन्या म्युझिअम शेजारीच दालीने डिझाईन केलेल्या दागिन्याचे दालनही आहे. ते पाहत असतांना आपल्याला दालीच्या विविध कलागुणाची साक्ष पटते.

या म्युझिअमला वर्षाला साधारण तेरा लाख कलाप्रेमी भेट देतात. मग फिगुरेसला दालीचे गाव म्हणणे सार्थ नाही का?

***

# माझ्या पहिल्या कथेची कथा

- सौ. पुष्पा नरेश दीक्षित, डोंबिवली

अशी एक म्हण आहे की, 'मनी वसे ते स्वप्नी दिसे'. पण माझ्या आयुष्यात एक घटना अशी घडली की जी मी कधी मनातही आणली नव्हती, नी कधी स्वप्नातही बघितली नव्हती. ती घटना प्रत्यक्षात माझ्या आयुष्यात घडली आणि माझ्या मन:पटलावर सुवर्णाक्षरे नोंदवून गेली. माझ्या जीवनातला सौख्याचा ठेवा मला अचानकपणे त्या घटनेने भरभरून दिला.

त्याचं असं झालं की, मी शाळकरी वयात असतांना मला वाचनाची फारच आवड निर्माण झाली होती, इतकी की वाचनापुढे मला तहानभूक कशाचीच जाणीव नसायची. मी वेळेला दोनदोन कादंबऱ्यांचाही फडशा पाडायची. पण कथा कादंबऱ्यांशिवाय मी दुसरे काहीच वाचत नव्हते. किंबहुना वाचावे हे समजत नव्हते. यावरून आई मला खूप रागावत असे. आईचं म्हणणं असं होत की, वाचन केल्यावर त्याचं चिंतन करावं, काय वाचलं ते लिहून ठेवावं. आपण काय वाचलं ते दुसऱ्याला सांगता यायला हवं. तरच वाचल्याचा उपयोग. शिवाय कथा कादंबऱ्यांशिवाय इतरही वाचन करावं, पण मी यापैकी काहीच करीत नसे. त्यामुळे माझ्या वाचनाला घरातून अजिबात प्रोत्साहन मिळत नसे, उलट विरोधच होत होता.

एकदा काय झालं की, अकरावी बोर्डाची परीक्षा नुकतीच झाल्यामुळे मी वाचनछंद जोपासण्याचे मनातल्या मनात मांडे खात असतांनाच आई माझ्यावर इतकी भडकली व म्हणाली, ''एवढ्या गोष्टी वाचतेस, पण एखादी गोष्ट स्वतः लिहू शकशील का? स्वतःच्या मनाची राहो; पण वाचलेल्या गोष्टींपैकी तरी एखादी लक्षात ठेऊन लिहून दाखव, नाहीतर उद्यापासून तुझी लायब्ररी बंद करते.'' आणखी बरंच काही बोलली. मी पण चिडले व एकदा आईला गोष्ट लिहून दाखवायचीच असा मनाशी चंग बांधला.

दुसरे दिवशी उजाडताच मी गोष्ट लिहायला बसले. बघता बघता आठ- दहा पाने गोष्ट लिहून झाली. दुपारी रागारागातच आईच्या पुढ्यात वहीची पाने टाकून म्हणाले, ''घे ही गोष्ट, वाचलेली नव्हे, तर स्वतःच्या मनाने लिहिली आहे. एकसारखी माझ्यामागे कटकट करतेस नां, घे, नी वाच.'' एवढे बोलून मी खेळायला चालती झाले. त्याच दिवशी संध्याकाळी माझा मामा आमच्याकडे आला होता. आईने त्याला माझ्याबद्दल काहीबाही सांगितले व माझी गोष्ट त्याला दाखवली. त्याने गोष्ट आईला वाचून दाखवली व त्यावर ''फारच छान'' असे शिक्कामोर्तब केले. तीच गोष्ट दुसऱ्या दिवशी दादाने माझ्याकडून फुलस्केप पेपरवर लिहून घेतली. हा विषय माझ्या दृष्टीने इथेच संपला.

झाल्या प्रकाराने मला एकच आनंद मिळाला की, आईने मला वाचनावरून ओरडण्याचे बंद केले व मी परत वाचनाच्या छंदावर तुटून पडले. बघता बघता मे महिना संपून जून उजाडला. त्या वर्षी वार्षिक परीक्षेत मराठी विषयात शाळेत पहिले बक्षीस मिळवून मी एस.एस.सी. पास झाले व रुपारेलमध्ये ॲडमिशन

घेतली. होता-होता जुलै महिना उजाडला आणि जुलै महिन्याचा एक दिवस माझ्या आयुष्यात सोनेरी क्षण घेऊन आला. दुपारच्या वेळेला मी अभ्यास करत असता पोस्टमनने आमच्या घरात एक ललनाचा अंक टाकला. मला आश्चर्यच वाटले. आमच्या घरात पोस्टाने अंक कसा काय आला? दादर सार्वजनिक वाचनालयाची दोनदोन पुस्तके घरात असताना दादाने आणखी एक अंक कशासाठी मागवला? असा विचार करतच मी जमिनीवरील अंक हातात घेतला आणि त्यावर माझ्या नावासहीत पत्ता असलेला बघून मला आश्चर्याचा धक्काच बसला. माझ्या नावाचा अंक म्हणजे प्रकार तरी काय आहे, म्हणून मी अंक उघडून बघितला तर अंकामध्ये लेखकांच्या नावांच्या सूचीमध्ये तिसऱ्या क्रमांकावर माझे 'उषा माधव बर्वे' नाव लिहिलेले मी पहिले. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. मी परत परत अंक चाळून बघितला, तर त्या दिवशी मी लिहिलेली गोष्ट चक्क अंकामध्ये छापून आली होती. मी धावतच आत गेले व आईला कडकडून मिठी मारली. हा आनंदाचा क्षण आईला कोणत्या शब्दात सांगावा तेच कळेना. मी आईला माझ्या नांवासहित छापून आलेली गोष्ट दाखवताच आईच्या डोळ्यात अश्रूंनी गर्दी केली, पण ते अश्रू आनंदाश्रू होते आणि त्या वेळेस मला आईबद्दल जे काही वाटले ते मी शब्दात वर्णन करू शकत नाही.

माझ्या आयुष्यातील ही अविस्मरणीय गोष्ट मी विसरूच शकत नाही. 'लेखक' या संज्ञेबद्दल फारसे कुतूहल किंवा जिज्ञासा नसतानाच मला अचानक 'लेखक' म्हणून मान मिळाला होता. या घटनेनंतर मला एकदम हुरूप येऊन मी आणखी दोन कथा लिहिल्या व त्या 'भरारी' मासिकाकडे पाठवल्या. त्या दोन्ही कथा मासिकातून छापून आल्या. मला, माझ्या अंगी सुप्तावस्थेत असलेल्या एका कलेचा शोध लागला. त्यानंतर 'रुपारेल' महाविद्यालयीन कथा स्पर्धेतही मला दरवर्षी एकतरी बक्षीस मिळू लागले. परंतु आता माझ्या एक गोष्ट लक्षात आली की कथा लिहिताना जनरल नॉलेजचीही फार आवश्यकता आहे. म्हणून मी इतरही बरंच कांही वाचन करू लागले. आता मी कथांप्रमाणे लेखही लिहू लागले

शिवराज्याभिषेकच्या त्रिशताब्दीनिमित्त झालेल्या लेखन स्पर्धेत 'साहित्यातून होणारे शिवदर्शन' या लेखाला द्वितीय क्रमांक, तर रविकिरण वाचनालयातर्फे (यवतमाळ) घेण्यात आलेल्या लेखन स्पर्धेत 'शिवरायांचे आठवावे रूप' या लेखासही द्वितीय क्रमांक मिळाला होता (१९७५). नंतर आणखी दोन कथा नभोवाणीसाठी लिहिल्या व त्या दोन्ही कथा नभोवाणीवर वाचनाची संधी मला मिळाली.

*मातेच्या प्रेरणेने लेखन कलेचा लागला मला छंद*
*मिळाला आयुष्यभराचा आनंद*

***



# दु:खद निधन

✻ श्री. मिलिंद विष्णू देवधर, रा. डोंबिवली.
(सभासद क्र.१४२०/पृ. क्र.७६६)
मृत्यू - दि. ११ ऑक्टोबर २०२२
हृदयविकाराने दु:खद निधन

✻ श्रीमती. सुनंदा जयंत देवधर
मृत्यू - दि. २४ नोव्हेंबर २०२२

✻ शैलजा सदाशिव देवधर, रा. डोंबिवली
(सभासद क्र.१०१५/पृ. क्र.३१५)
मृत्यू- दि. १९ नोव्हेंबर २०२२
मंडळाचे माजी अध्यक्ष सदाशिव गजानन देवधर यांची पत्नी व माजी कार्यकारिणी सदस्य श्री. महेंद्र देवधर यांची आई

✻ सुरेश धुंडीराज देवधर, रा. डोंबिवली
(सभासद क्र.३२३/पृ. क्र.७०४)
मृत्यू - दि. २६ नोव्हेंबर २०२२

✻ सौ. वृंदा जनार्दन साने
(कुलवृत्तांत पृ. क्र.३५९)
माहेरवाशीण - कुंदा यशवंत देवधर
मृत्यू - दि. २८ नोव्हेंबर २०२२

✻ श्री. सुनिल जयंत देवधर, रा. पुणे
(सभासद क्र.१४२०/पृ. क्र.७६६)
मृत्यू - दि. २१ जुलै २०२२
श्री. सुनिल देवधर पुणे येथे देवधर ट्रॅव्हल्स नावाने व्यवसाय करीत होते.

दु:खितांचे दु:खात देवधर मंडळ सहभागी आहे.

- अध्यक्ष

---

### शब्दकोड्याची उत्तरे

**आडवे शब्द :–**

१) प्रताप ४) प्राकतन ५) स्थावर ८) आभा ९) कानस १०) तात ११) द्वाड १२) मजा १४) साज १८) काशी १९) पातळ २१) वजन २३) वातड २४) समई २६) फणा २७) कबर २९) खारट ३१) दाम ३२) सरदार

**उभे शब्द :–**

१) प्रस्थान २) ताव ३) परवड ४) प्रात:काळ ५) तत्सम ६) प्रभात ८) आता ११) द्वादशी १३) जाणीव १४) साका १५) प्रपात १६) बळ १७) तन २०) तडफड २२) जबाबदार २३) वाईट २४) सखा २५) मरण २८) रम ३०) नर

(उत्तरे इतरत्र)

www.deodharmandal1968.org
या आपल्या वेबसाईटला अवश्य भेट द्या

## कल्याण डोंबिवली परिसरातील कुलबंधुभगिनींचा आनंद मेळावा डोबिवली येथे नुकताच संपन्न झाला. त्याची क्षणचित्रे



















Book Packet
Containing periodical
R.N.I. No. : MAHMAR/2000/4869

प्रति,

माननीय

संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.